आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२४ नोव्हेंबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात सरकार स्थापनेसाठी राजकीय हालचालींना वेग, सत्तास्थापनेबाबत महायुतीत कसलेही मतभेद नसल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं स्पष्टीकरण

- पराभवाची कारणं शोधून पुन्हा नव्या दमानं उभं राहण्याचा शरद पवार यांचा निर्धार

- जो देश आपला इतिहास जपतो, त्यांचं भविष्यही सुरक्षित असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ‘मन की बात’ मध्ये प्रतिपादन

- उद्यापासून सुरु होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचं सरकारचं सर्वपक्षीय बैठकीत आवाहन

**आणि**

- कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचं ऑस्ट्रेलियासमोर ५३४ धावांचं आव्हान / यशस्वी जयस्वालच्या १६१ धावा, तर विराट कोहलीचं नाबाद शतक

**<><><><><>**

भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीच्या दणदणीत विजयानंतर महाराष्ट्रात सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. राज्यात सरकार स्थापन करण्याविषयी महायुतीचे सर्व घटक पक्ष मिळून चर्चा करू, असं शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. महायुतीमध्ये विधानसभा

निवडणुकीसाठी जागावाटप करताना कोणतेही मतभेद नव्हते. त्यामुळे सत्तास्थापन करतानाही मतभेद नाहीत असं ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत त्यांची पक्षाच्या गटनेतेपदी निवड झाली.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना आणि राजपत्राच्या प्रती भारत निवडणूक आयोगाचे उप मुख्य  निवडणूक आयुक्त हिरदेश कुमार आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम यांनी आज राज्यपाल सी राधाकृष्णन यांना सादर केली. विधानसभा निवडणुकीचे निकाल काल जाहीर झाले. यात निवडून आलेल्या सदस्यांची नावं राजपत्रात  प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

यावेळी राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, भारत निवडणूक आयोगाचे सचिव सुमन कुमार दास आणि कक्ष अधिकारी निरंजन कुमार शर्मा उपस्थित होते.

**<><><><><>**

पराभवाची कारणं शोधून पुन्हा नव्या दमानं उभं राहू, नव्या पिढीला उभं करणं हा आपला कार्यक्रम राहील, असं ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ते आज सातारा जिल्ह्यात कराड इथं वार्ताहर परिषदेत बोलत  होते. महायुतीनं लोकांसमोर प्रभावीपणे त्यांचा कार्यक्रम मांडला, आपल्याकडून प्रचारात कमतरता राहिल्याचं पवार म्हणाले. ओबीसी मतदार महाविकास आघाडीच्या विरोधात गेले का, या प्रश्नाला उत्तर देताना पवार म्हणाले की, मंडल आयोगाची अंमलबजावणी आपल्या सरकारच्या काळात महाराष्ट्रात

झाली. त्यामुळे ओबीसी मतदार आपल्याविरोधात जातील हे मनाला पटत नाही. लाडकी बहीण योजनेमुळे मतदारांवर प्रभाव पडला असंही पवार यांनी सांगितलं.

<><><><><>

जो देश आपला इतिहास जपतो, त्यांचं भविष्यही सुरक्षित असतं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. हा या कार्यक्रमाचा ११६ वा भाग होता. याच उद्देशानं देशातल्या गावांचा इतिहास जतन करण्यासाठी एक निर्देशिका तयार करायचा प्रयत्न सुरू आहे, प्राचीन काळातील सागरी प्रवासाबद्दलच्या भारताच्या क्षमतेशी संबंधित पुरावे जतन करण्याची मोहीमही सुरू केली आहे. याच प्रयत्नांचा भाग म्हणून गुजरातमध्ये लोथल इथं एक संग्रहालय उभारलं जात असून, नागरिकांकडे कोणत्याही हस्तलिखिताची किंवा ऐतिहासिक दस्तऐवजाची प्रत असेल तर ती त्यांनी भारतीय राष्ट्रीय अभिलेखागाराच्या मदतीनं जतन करावी, असं आवाहन त्यांनी केलं. या वेळी प्रधानमंत्र्यांनी गयाना, ओमान, स्लोव्हाकिया यांसारख्या देशांसह इतरत्रही स्थलांतरीत झालेले भारतीय त्या प्रदेशांशी एकरूप होतानाही, आपला भारतीय वारसा आणि संस्कृतीच्या नोंदीकरणीसाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

डिजिटल अटक या प्रकाराची तरतूद अस्तित्वात नसून हे लोकांना फसवण्याचं कारस्थान असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आज पुन्हा एकदा स्पष्ट केलं. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना, ज्येष्ठ नागरिक जास्त बळी  पडतात. अशा परिस्थितीत त्यांना जागरुक करणं आणि सायबर घोटाळ्यांपासून वाचवण्यामध्ये मदत करणं ही आपली जबाबदारी असल्याचं ते म्हणाले.

एक पेड माँ के नाम या मोहिमे अंतर्गत अवघ्या पाच महिन्यात १०० कोटी वृक्ष लागवडीचा टप्पा पार झाला असल्याची माहिती त्यांनी दिली. ही मोहीम आता जगभर पसरल्याचं ते म्हणाले.

आज राष्ट्रीय छात्रसेना दिवस असल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी केलं. आपणही राष्ट्रीय छात्रसेनेत होतो, त्यावेळचा आपला अनुभव स्वतः साठी अमूल्य आहे. राष्ट्रीय छात्रसेनेमुळे युवा वर्गात शिस्त, नेतृत्व आणि सेवेची भावना रुजते, असं ते म्हणाले.

विकसित भारताच्या जडणघडणीत युवा वर्गाची भूमिका मोठी आणि महत्वाची असणार आहे, असं ते म्हणाले…

**होल्ड- बाईट - प्रधानमंत्री**

येत्या १२ जानेवारीला स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीदिनी साजरा होणाऱ्या असलेल्या युवा दिनाच्या निमित्तानं दिल्लीत ११ आणि १२ जानेवारी रोजी दिल्लीत भारत मंडपम इथं विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग या उपक्रमाअंतर्गत युवा मेळाव्याचं आयोजन केलं असल्याची माहिती त्यांनी दिली. या मेळाव्यात देशाच्या तळागाळातून निवडलेले दोन हजार तरुण - तरुणी सहभागी होणार आहेत. जगभरातल्या प्रतिष्ठित तज्ञांसह आपणही या उपक्रमात सहभागी होणार आहोत, या उपक्रमातून युवा वर्गाला त्यांच्या कल्पना मांडायची संधी मिळेल तसंच त्या प्रत्यक्षात साकारण्यासाठी कृती आराखडाही तयार करता येईल, आपण सारे मिळून देश घडवू या आणि देशाचा विकास करू या, असं आवाहन त्यांनी केलं.

पुस्तकं माणसाची सर्वात जास्त चांगली मित्र असतात आणि ग्रंथालयं ही मैत्री घट्ट करणारी उत्तम जागा असतात, असं सांगत देशभरात ग्रंथालयांची सोय उपलब्ध करून देण्यासाठी सामान्य नागिराकांकडून होत असलेल्या प्रयत्नांची माहिती

त्यांनी दिली. नागरिकांनी आपलं जीवनमान बदलण्यासाठी पुस्तकांशी मैत्री वाढवण्याचं आवाहन त्यांनी केलं.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी पर्यावरण, वन्य जीव संवर्धन तसंच स्वच्छतेचं महत्व आणि त्यादृष्टीनं होत असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख केला. स्वच्छतेसाठी शासकीय कार्यालयांमध्ये राबवलेल्या उपक्रमांची तसंच नागरिकांकडून सुरु असलेल्या उपक्रमांची माहितीही त्यांनी श्रोत्यांना दिली. यानिमित्तानं त्यांनी अक्षरा आणि प्रकृति या मुंबईतल्या दोन मुली आपल्या सहकाऱ्यांसोबत चिंध्यांपासून फॅशनचे कपडे तयार करत असल्याचं सांगत, त्यांच्या उपक्रमाची प्रशंसा केली. अशा प्रयत्नांमुळे देशाच्या स्वच्छता मोहिमेला चालना मिळते, आणि ही एक अविरत किंवा अखंड चालणारी मोहीम आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

संसदेच्या उद्यापासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात सरकार कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी तयार असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत सरकारनं बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. अधिवेशनादरम्यान लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज सुरळीत पार पाडायचं आवाहन रिजिजू यांनी विरोधी पक्षांना केलं.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक झाली. केंद्रीय मंत्री अनुप्रिया पटेल, एल मुरुगन, बीजू जनता दलाचे खासदार सस्मित पात्रा, समाजवादी पक्षाचे राम गोपाल यादव, एमडीएमकेचे वायको, काँग्रेसचे प्रमोद तिवारी, जयराम रमेश या बैठकीला उपस्थित होते.

संसद अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनीही सदस्यांना सभागृहात संसदीय शिष्टाचाराचं पालन करायचं आवाहन केलं आहे.

हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होणार असून ते २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. मात्र, २६ नोव्हेंबरला संविधान दिनानिमित्त सदनाचं कामकाज होणार नाही.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पर्थ इथं सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात, तिसऱ्या दिवसअखेर विजयासाठी ५३४ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात ३ बाद १२ धावा झाल्या आहेत.

आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारतानं आपल्या दुसऱ्या डावात कालच्या बिनबाद १७२ या धावसंख्येत आणखी ३१५ धावांची भर घालत ६ बाद ४८७ या धावसंख्येवर डाव घोषित केला. पहिल्या डावातल्या ४६ धावांच्या आघाडीमुळे दुसऱ्या डावात भारताची एकूण आघाडी ५३३ धावांवर पोहचली.

काल ९० धावांवर नाबाद असलेल्या यशस्वी जयस्वालनं शतक पूर्ण करत १६१ धावांची खेळी केली, तर एक के.एल. राहुल ७७ धावा करून बाद झाला. या दोघांनी सलामीसाठी २०१ धावांची भागिदारी केली. त्यानंतर आलेल्या विराट कोहलीनंही कसोटी क्रिकेट कारकिर्दीतलं ३० वं शतक झळकावत नाबाद १०० धावांची खेळी केली. विजयासाठी ५३४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दुसऱ्या डावातही ऑस्ट्रेलियालाची फलंदाजी गडगडली. पहिल्याच षटकात जसप्रित बुमराहनं सलामीवीर नॅथन याला शून्यावर बाद केलं. त्यानंतर मोहम्मद सिराज यानं नाईट वॉचमन म्हणून आलेला कर्णधार पॅट कमीन्स याला, तर आजच्या खेळाच्या अखेरच्या षटकाच्या दुसऱ्या **बुमराहनं** मानस लबूशेन याला माघारी धाडलं. त्यानंतर पंचांनी दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबवला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहमदनगर इथं ११ पूर्णांक ७ दशांश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात, सर्वत्र हवामान कोरडं राहिल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//